# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/02/2023 (सोमवार) सकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत सोनेगाव राजा येथे दिनांक सुमारास फिर्यादी नामे– श्रीधर अशोक खेडेकर, वय २५ वर्ष रा. सोनेगाव राजा ता. कामठी हा हल्दीराम कंपनी येथे कामाला गेला होता व त्याचे वडील हे शेतीच्या कामासाठी गेले होते तेव्हा फिर्यादीचा लहान भाऊ यांनी फोन करून फिर्यादीला सांगीतले की फिर्यादीच्या घराच्या दरवाजाचा लॉक तुटलेला आहे व गोदरेज आलमारीतील सामान अस्ताव्यस्त पडलेले आहे. अशा मिळालेल्या माहीतीवरून फिर्यादीने आपल्या घरी येवुन पाहीले तेव्हा त्याचे घराचे दरवाजाचे लॉक तुटलेले दिसुन आले व गोदरेज कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडलेले आढळुन आले. गोदरेज कपाटातील लहान लॉकर मधील ९ ग्रॅम सोन्याचे काळे मणी असलेले मंगळसुत्र २) नगदी २१,०००/–रू असा एकुण ३६०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार हरीश यंगलवार मो. नं. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

## दुखापत

**१) पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १२ किमी अंतरावर मौजा पारडसिंगा बसस्टॉप येथे दि. २५/२/२०२३ चे १८.१५ वा. सुमारास यातील आरोपी नामे– प्रफुल वानखेडे रा. पारडसिंगा ता. काटोल जि. नागपूर हा नेहमी दारू पिण्याचे सवयीचा असुन नेहमी दारू पित असतो यातील नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी नामे– पंढरी साहेबराव उमक, वय ४८ वर्ष, रा. पारडसिंगा ता काटोल जि. नागपूर हा बसस्टॉप येथे बसला असता आरोपी याने फिर्यादीस खर्रा मागितला असता आरोपीने खर्रा नाही असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीस शिविगाळ केली व त्याचे जवळील तलवारीने पोटावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, भादवी. ४/२५ आर्म ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गौरव आगरकर ब. नं. ८९१ मो. नं. ८४२१७५५८४९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. काटोल :—** अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा धनगर पूरा काटोल येथे दि. २५/२/२०२३ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— सौ. कवीता मंगलनाथ रेवतकर, वय ३७ वर्ष, रा. धनगरपूरा काटोल ता. काटोल जि. नागपूर व आरोपी नामे— मंगलनाथ विनायक रेवतकर, वय ३८ वर्ष, रा. धनगरपूरा काटोल ता. काटोल जि. नागपूर हे पती व पत्नी असून घटना तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हि कामावरून घरी परत आली तेव्हा आरोपीने तिच्या मुलीला जेवन मागीतले मूलीने म्हटले की जेवन नाही त्यावरुन फिर्यादीने म्हटले की मी स्वयंपाक बनविते यावरुन आरोपी हा वाद करु लागला तेवढयात फिर्यादीची मुलगी हि बाहेर निघाली असता फिर्यादी पण तिच्या मागे निघाली तेव्हा आरोपी सुदधा फिर्यादीच्या मागे आला व आरोपीने अंगणातील नळाजवळील विट उचलून फेकून मारली ती विट फिर्यादीच्या डाव्या बाजूच्या ओठावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, भादवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पवन आगरकर पोस्टे काटोल ब. नं. ५०० मो. नं. ९८३४२८१४०१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**